REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ.
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख ९ मार्च, १९३८ अंक १०

THE HOUSE OF MODERN STYLE SUITS.

THE DECCAN TAILORING FIRM, DECCAN GYMKHANA, POONA 4.

TAILORS & CLOTH MERCHANTS

—A FRESH STOCK OF NEW DESIGNS—

WOOLEN, COTTEN AND SILK SUITINGS, SHIRTINGS AND TROUSER FLANELS.

LONDON TRAINED CUTTER.

MANAGER—M. N. PATASKAR,
F. C. D. ( London ).

लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत."

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणें नं. १.

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंटस् नेमणें आहेत. तरी विशेष माहितीकरितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करावा.

" अर्थ " ग्रन्थमाला
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं. १ रु. ( ट. ख. निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४.

अप-टु-डेट शिलाई करतां

माहिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक पुणें १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [ खादी भांडाराचे माडीवर

# विविध माहिती

### जगांतील सर्वांत उंच व प्रचंड प्रासाद

आकाशभेदी, उंच व विस्तृत इमारतींविषयीं अमेरिकन शहरांची प्रसिद्धी आहे. त्यांवर ताण करणारा, जगांत सर्वांत उंच व भव्य असा सोव्हिअट प्रासाद रशियांत मॉस्को शहरीं बांधला जात आहे. त्याची उंची १३४८ फूट होणार असून लेनिनचा ३२५ फूट उंचीचा पुतळा त्यांत उभा केला जाणार आहे.

### सिनेमा नटांची प्राप्ती

प्रेक्षक आकर्षून घेण्यांत शर्ले टेंपल व क्लार्क गेबल ह्यांचा सिनेमानटांमध्यें वरचा नंबर लागतो. गॅरी कूपर व रोनॉल्ड कोलमन ह्यांची प्राप्ती सालिना प्रत्येकी १० लक्ष रुपये आहे.

### विषारी वायू आणि मुखत्राण

शत्रूच्या विषारी वायूपासून जनतेचें संरक्षण व्हावें म्हणून अडीच कोटींच्यावर मुखत्राणें ब्रिटिश सरकारनें तयार करून संग्रहीं ठेवलीं आहेत. त्यांपैकीं ९० लक्ष लंडनमध्यें आहेत आणि दर आठवड्यास ६½ लक्ष नवीन बनवण्यांत येत आहेत. प्रसंग आला असतां मुखत्राणांचा उपयोग कसा करावा ह्याची माहिती लोकांस देण्याची जबाबदारी कायद्यानें स्थानिक संस्थांवर टाकण्यांत आली आहे.

### मध्यवर्ती सेंट्रल प्रेसचा उत्पन्न-खर्च

१९३६-३७ सालीं सरकारी सेंट्रल प्रेसला ९२,७१२ रु. उत्पन्न मिळालें व पुस्तक विक्रीबद्दल बुकडेपोकडे ७३,६७४ रु. जमा झाले. खर्च ४,२०,६४७ रु. आला. म्हणजे, खर्चाचे मानानें उत्पन्न शेकडा ६० पडलें.

### चालू मोसमांतील हिंदी साखरेचें उत्पादन

चालू मोसमांत १४५ हिंदी साखर कारखाने चालू असून साखरेचें अपेक्षित उत्पादन १० लक्ष, ४५ हजार टन इतकें आहे. १९३६-३७ मध्यें १३७ कारखान्यांमध्यें ११ लक्ष, ११ हजार टन साखर तयार झाली होती. म्हणजे, चालू मोसमांतील उत्पादन ६ टक्क्यांनीं कमी भरेल, असा अजमास आहे. एकूण १ कोटि, १४½ लक्ष टन ऊंस गाळण्यांत येईल व उतारा ९·१४ टक्के पडेल अशी अपेक्षा आहे.

### कॉंग्रेस अधिवेशनाचे वेळीं २३ हजार रुपयांची वीज

हरिपुरा येथील कॉंग्रेस अधिवेशनाच्या वेळीं २३ हजार रुपयांची वीज वापरण्यांत आली.

### मद्रास येथील ट्रामवहातुक

मद्रास येथील विजेच्या ट्रॅमवेचा लायसेन्स संपल्यानंतर तो पुन: न देण्याचें कॉर्पोरेशननें ठरविलें आहे. ट्रामवेची वहातुक स्वत:कडे घेण्याचा कॉर्पोरेशनचा विचार आहे.

### श्री. केंभावी ह्यांचे बँकिंगवर व्याख्यान

गुरुवार, ता. १० मार्च, १९३८ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां प्रो. वा. गो. काळे ह्यांचे अध्यक्षतेखालीं, बँक ऑफ इंडिया लि.च्या पुणें शहर शाखेचे एजंट, श्री. बी. आर. केंभावी, ह्यांचें गोखले हॉलच्या वरच्या मजल्यावर, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सतर्फे ' मी इंग्रजी बँकेंत काय पाहिलें' ह्या विषयावर व्याख्यान होणार आहे.

### शाळांत रेडिओ व सिनेमा

ग्रेटब्रिटनमधील ७,००० शाळांतून रेडिओ आहेत व २,००० शाळांतून भिंतीवर चित्रें दाखविण्याच्या प्रोजेक्टरची सोय आहे.

### मुंबई सरकारची पावसाळी राजधानी

मुंबई सरकार दरसालप्रमाणें आपला मुक्काम पावसाळ्यापुरता यंदा पुणें येथें ठेवणार आहे.

### सुएझ कालव्याची चलती

सुएझच्या कालव्यामधून गेल्या सालीं जहाजांची जेवढी वहातुक झाली तेवढी पूर्वी कधींच झालेली नव्हती. एकूण ६,६३५ आगबोटींनीं त्या कालव्यांतून प्रवास केला आणि त्यांतल्या मालाचें वजन तीन कोटि चौसष्ट लक्ष टन भरलें.

### नव्या आगबोटींची जागतिक बनावट

गल्या वर्षी सबंद जगांत (रशिया सोडून) मिळून ११०१ नव्या आगबोटी बांधून तयार झाल्या आणि त्यांचें एकूण वजन २७ लक्ष टन होतें. ह्यांपैकी सुमारें ९½ लक्ष टन वजनाचीं जहाजें ग्रेट ब्रिटन व आयर्लंड ह्या देशांत तयार झालीं. उत्पादनांत इंग्लंडच्या खालोखाल जपानचा नंबर लागतो आणि त्याच्या खालीं जर्मनी व अमेरिका हे देश येतात.

### ब्रिटनमध्यें स्वदेशी गालिच्यांसाठी संरक्षक जकात

यंत्रावर केल्या जाणाऱ्या गालिचांच्या आयातीवर इंग्लंडमध्यें दर चौरस वारास ९ पेन्स जकात होती ती आतां १ शिलिंग करण्यांत आली आहे. ब्रिटनमधील गालिचांच्या स्वदेशी धंद्यास पुरेसें संरक्षण देण्याच्या हेतूनें ही वाढ केलेली आहे.

### अफगाणिस्थानांतील पेट्रोलच्या खाणी

अफगाणिस्थानांतील २¼ लक्ष चौरस मैल क्षेत्राच्या टापूंतील पेट्रोल काढण्याचा मक्ता अमेरिकन कंपन्यांस मिळाला आहे. अद्याप हात न लागलेला असा हा पेट्रोलचा जगांतील सर्वांत मोठा साठा आहे.

### प्रवाशांच्या स्वागताची पूर्वतयारी

चीन-जपान युद्धामुळें, जपानांतील परदेशीय प्रवाशांची संख्या घटली आहे, तथापि १९४० सालीं टोकियो येथें जागतिक ऑलिंपिक सामने भरणार आहेत, त्या वेळीं प्रवाशांची गर्दी उडेल अशी अपेक्षा आहे. अनेक वाटाड्यांस प्रमुख युरोपियन भाषांचें व्यवहारापुरतें ज्ञान देण्यास आजच प्रारंभ झाला आहे. टोकियो शहरासंबंधीं माहिती देणारीं खिशांत मावणारीं छोटीं पुस्तकेंहि तयार करण्यांत येत आहेत.

### खासगी टेलिफोन कंपन्यांचें राष्ट्रीकरण

मुंबई, कलकत्ता व मद्रास येथील टेलिफोन कंपन्यांच्या लायसेन्सची मुदत १९४३ अखेर संपते. त्यानंतर, ह्या कंपन्या विकत घेण्याचा सरकारास अधिकार आहे. सदरहु अधिकार बजावण्याचा सरकारचा विचार आहे.

### फ्रान्स, जर्मनी व ग्रेटब्रिटन ह्यांमधील घोडे

ग्रेटब्रिटनचे शेतकी खात्याचे मंत्री, मि. मॉरिसन, ह्यांनीं पार्लमेंटांत घोड्यांच्या संख्येविषयीं खालील माहिती सांगितली. ह्या आकड्यांत लष्करी घोड्यांचा समावेश केलेला नाहीं.

| | १९२७ | १९३६ |
|---|---|---|
| | लक्ष हजार | लक्ष हजार |
| फ्रान्स | २९ २७ | २७ ७४ |
| जर्मनी | ३८ १० | ३४ ०७ |
| ग्रेटब्रिटन | १७ ०० | ११ ५० |

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रु. किंमत |
|---|---|
| २०-२-३८ ते २६-२-३८ | ६१,९६,७६६ |
| २७-२-३८ ते ५-३-३८ | २,८४,२७६ |
| २१-९-३१ ते ५-३-३८ | ३११,७३,५३,९०५ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ११० |
| २ सावकार नियंत्रण बिलांतील दोष (अग्रलेख १) | १११ |
| ३ मुंबई प्रॉ. को. इन्स्टिट्यूट (अग्रलेख २) ... | ११२ |
| ४ ग्वालेर संस्थानांत ग्रामसुधारणा (अग्रलेख ३) | ११२ |
| ५ स्फुट विचार ... मध्यवर्ती असेंब्लींत बजेट-चर्चा बंद–मध्यवर्ती कायदे मंडळांतील सभात्याग––प्रांतिक अंदाजपत्रकाची चर्चा––मुंबई सरकारचें फिनॅन्स बिल मंजूर झालें–सोन्याच्या नाण्यास मागणी—ब्रिटनच्या संरक्षणार्थ खाद्य पदार्थांची साठवण | ११३ |
| ६ मुंबई प्रांतांतील रस्ते | ११५ |
| ७ इंग्रजी साप्ताहिकाचा संसार ... | ११५ |
| ८ आयर्लंडचें औद्योगिक धोरण ... | ११५ |
| ९ अंदाजपत्रक व फिनॅन्स बिल ... | ११६ |
| १० तंबाखूवरील कराच्या उत्पन्नांत वाढ ... | ११७ |
| ११ निवडक बाजारभाव | ११९ |



# अर्थ

बुधवार, ता. ९ मार्च, १९३८


## सावकार नियंत्रण बिलांतील कांहीं दोष

सावकारी व्यवहारांचें नियमन करणाऱ्या कायद्याचा मसुदा मुंबईच्या प्रधानमंडळानें प्रांतिक विधिमंडळास सादर केला, त्यांतील प्रमुख तत्त्व व कायद्याचें सामान्य स्वरुप ह्यांस सर्वत्र पाठिंबा मिळालेला आहे. प्रांतिक बँकिंग चौकशी कमिट्यांनीं, अशिक्षित जनतेच्या हितसंरक्षणाकरितां सावकारांच्या देवघेवींवर नियंत्रण असावें असें सुचविलें होतें त्यास कित्येक वर्षें लोटलीं. मध्यंतरीच्या मंदीच्या तीव्रतेमुळें गरीब ऋणकोंची दुःस्थिति तीव्रतर झाली असल्यानें, त्यांच्या न्याय्य हिताचें रक्षण करणें आतां ज्यास्तच निकडीचें झालें आहे. मुंबई सरकारनें त्याबाबतच्या कायद्याचा मसुदा तयार केला, ह्याबद्दल प्रांतिक प्रधानमंडळाचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. अशा प्रकारच्या व्यापक योजनेंत कांहीं दोष रहाणें अपरिहार्य असणार, हें उघड आहे. सरकारनें आपलें बिल अल्प मुदतींत तयार केलें असल्यानें कित्येक गोष्टींचा विचार करण्यास सवड न उरणें हेंहि स्वाभाविक आहे. तथापि, बिलांतील कित्येक दोष ढोबळ स्वरूपाचे असून, ते दुरुस्त होणें अत्यावश्यक आहे. मराठा चेंबरनें ह्या बाबतींत आपला अभिप्राय थोडक्यांत सरकारास मागेंच कळविला होता व आतां चेंबरनें एक विस्तृत पत्र लिहून कित्येक महत्त्वाच्या आक्षेपांचा खुलासा केला आहे.

बिलांतील 'सावकार' ह्या संज्ञेच्या अतिव्याप्तीबद्दल चेंबरची तक्रार आहे. व्यापारी व्यवहारांत रोज अनेक देणीं--घेणीं निर्माण होतात. तीं सावकार नियंत्रण बिलाचें कक्षेंत येतील कीं काय ह्याविषयीं आज भीतियुक्त शंका प्रदर्शित केली जात आहे.हे व्यवहार वास्तविक सावकारी स्वरूपाचे नसतात. दिलेल्या मालाबद्दलच्या बाकीवर व्याज मिळविणें हा त्यांत प्रधान हेतु नसतो. व्यापारी व्यवहारांत व्याजाची कमाई गौण महत्वाची असते, त्याची सावकारी व्यवहाराशीं बरोबरी करणें म्हणजे व्यापारी देवघेवींस निष्कारण पायबंद घालणें होय. म्हणून, सामान्य व्यापारी देणीं–घेणीं नियोजित बिलानें नियंत्रित होतां कामा नयेत, असेंच सर्वसाधारण मत आहे.

धंदा म्हणून सावकारी न करणाऱ्या व किरकोळ रकमा उसनवारीनें देणाऱ्या लोकांस बिलांतील कलमें लागू होऊं नयेत; त्याचप्रमाणें, बँकांच्या व्यवहारांचा समावेश सावकारीचे व्याख्येंत होऊं नये, असें चेंबरचें म्हणणें आहे. बँकिंगचा धंदा त्याबाबतच्या नवीन कायद्यानें सुनियंत्रित केलेला असल्यानें त्यास सावकार नियंत्रण बिल लागू करण्याची आवश्यकता नाहीं ही गोष्ट तात्काळ मान्य होण्यासारखी आहे. आयुर्विमा कंपन्यांचा व्यवहार चक्रवाढ व्याजावरच प्रतिष्ठित आहे.वार्षिक हप्ते, मिळावयाची रकम, बोनस, इत्यादि सर्व बाबींचा हिशेब ह्याच तत्त्वावर होतो. सावकारांनीं चक्रवाढ व्याज घेऊं नये, हा निर्बंध विमा मंडळ्यांस लागू केल्यास, त्यांच्या हिशेबांचा पायाच उखडल्यासारखें होईल व अपेक्षित उत्पन्नांतील तूट भरून निघण्यास दुसरा मार्ग नसल्यानें त्यांनीं रचलेल्या हिशेबी योजनांची पूर्तता करणें त्यांस अशक्य होईल. नवीन विमा कायद्यानें आयुर्विमा निधीपैकीं ५५ टक्के रकम सरकारी रोख्यांत गुंतविलीच पाहिजे असा निर्बंध घातला आहे. उरलेल्या ४५ टक्के रकमेवरहि पुरेसें व्याज न मिळाल्यास विमा मंडळ्यांनीं उत्पन्नाची तरतूद कशी करावी? प्रत्येक प्रांतांतील ह्या बाबतची योजना एकसारखी नसल्यास, कांहीं विमा मंडळ्यांवरच व्याजाच्या दराचें नियंत्रण बसून त्यांस अन्याय होणार आहे.

सावकार आपल्या धंद्यामध्यें वर्षाचे अवधींत किती रकम गुंतविणार ह्याचा निर्देश त्यानें आपल्या परवान्याबाबतच्या अर्जांत केला पाहिजे अशी बिलांत योजना आहे. सावकारीच्या व्यवहारांत किती भांडवल घालावयाचें हें वर्षाचे प्रारंभीं निश्चित करतां येणें कठीण आहे. प्रत्यक्ष गुंतविलेल्या रकमेवरच लायसेन्स फी आकारणें सयुक्तिक होईल. अपेक्षित भांडवलाच्या रकमेवर फी ठेवल्यानें निष्कारण घोटाळा व धंद्यास अडथळा निर्माण होणार आहे. त्याचप्रमाणें, सावकारीचा परवाना रद्द करण्यासंबंधाच्या कलमांत दुरुस्ती होणें आवश्यक आहे व सावकारांच्या संरक्षणाची व्यवस्था सुधारली पाहिजे. नाहींतर, सावकारांस व इतरांस अडचणींत आणण्याचें शस्त्र उपद्व्यापी लोकांच्या हातीं दिल्यासारखें होणार आहे.

सावकारांच्या अनिष्ट कारवायांवर प्रभावी नियंत्रण बसून गरीब, निरक्षर व अडाणी लोकांच्या हिताचें रक्षण व्हावें हा प्रस्तुत कायद्याचा प्रमुख हेतु आहे. तो साध्य व्हावा, ह्यासाठी नियोजित बिलानें सावकारीच्या धंद्यावर अनेक बंधनें बसविलीं आहेत. तथापि, त्यांचा परिणाम पतीच्या सर्वच व्यवहारांस जाचक होऊन सावकारांमार्फत मिळावयाच्या कर्जास प्रतिबंध झाला, तर जनतेची कुचंबणा झाल्याविना रहाणार नाहीं. आपला धंदा सोडण्याची पाळी सामान्य प्रतिष्ठित सावकारांवर येतां कामा नये; कारण त्यांची जागा घेण्यास आज दुसरें कोणी नाहीं. खेडेगांवांतील तारण न देतां घेणाऱ्या लोकांस सावकारांवरच अवलंबून रहावें लागतें, ही गोष्ट स्पष्ट आहे. पतीच्या ह्या व्यवस्थेस धक्का पोंचून, सावकारांचा धंदा बंद होण्याची पाळी आली, तर तें इष्ट होणार नाहीं. गरीब व अडाणी जनतेवर जुलूम व लोकांच्या आर्थिक दुःस्थितीवर गब्बर होण्याची सावकारांस मिळत असलेली संधी, ह्यांस जरूर प्रतिबंध झाला पाहिजे. त्याबरोबरच, सावकारांच्या धंद्यांतील किफायतशीरपणा सर्वस्वी नाहींसा करूनहि भागणार

नाहीं. विशिष्ट वर्गाच्या हिताकडे पहातांना इतर वर्गाच्या हिताची पायमल्ली आणि त्यांचें निष्कारण नुकसान होणार नाहीं, अशी खबरदारी घेण्यांत आली पाहिजे. मराठा चेंबरनें ह्याबाबत केलेल्या सूचना योग्य असून सरकार त्या विचारांत घेईल, अशी आशा आहे.

## प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट

### पुनर्घटना कशी करावी ?

(२)

सर्व सहकारी संस्थांची मध्यवर्ती, लोकमतानुवर्ती व प्रातिनिधिक अशी प्रांतिक संस्था कार्यक्षम रीतीनें कारभार करीत असण्याची आवश्यकता कोणासच नाकारतां येणार नाहीं. सहकारी चळवळीचें आद्य तत्वच हें आहे कीं तीमधील संस्था त्यांच्या सभासदांनीं आपल्या जबाबदारीवर चालविल्या पाहिजेत आणि सरकारी अधिकारी व खातें ह्यांनीं त्यांस उत्तेजन व सहाय बाहेरून दिलें पाहिजे. चळवळीचा विस्तार आणि तिची प्रगति व सुधारणा ह्यांविषयींचे प्रश्न सहकारी कार्यकर्त्यांनीं सरकारच्या सहानुभूतीनें व सहायानें स्वतःच सोडवणें आवश्यक व इष्ट असतें. मुंबईच्या प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटच्या हातून व्हावें तसें कार्य झालें नसेल आणि त्यासंबंधांत चळवळींतील कार्यकर्त्यांमध्येंहि असमाधान असेल. तथापि, ह्या बाबतींत सुधारणा करण्याचा मार्ग म्हणजे इन्स्टिट्यूटचा मूळ उद्देश व त्याचें चळवळींतलें उचित स्थान ह्यांचें उच्चाटन करणें हा नसून परिस्थितीस अनुसरून त्यांस योग्य वळण लावणें हा आहे. ह्या दृष्टीनें पहातां इन्स्टिट्यूटच्या घटनेंत त्याचे उद्देश व ध्येय हीं नमूद केलेलीं आहेत, त्यांस हात लावण्याचें कारण दिसत नाहीं. प्रस्तुत विषयावरच्या मागील लेखांत दर्शविल्याप्रमाणें सरकारी पत्रकांत इन्स्टिट्यूटनें करावयाचीं कामें सांगितलीं आहेत, त्यांच्याशीं हे उद्देश विसंगत नाहींत. सर्वच उद्देश पार पाडण्याची तरतूद आज करतां आली नाहीं, तरी उद्यां कदाचित् करतां येईल. म्हणून इन्स्टिट्यूटचें ध्येय व कार्यक्षेत्र ह्यांस तात्विक मर्यादा घटनेंत घालण्याचें प्रयोजन नाहीं.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीचा विशेष, तीमध्यें उत्साहानें मार्गदर्शनाची, पुढारीपणाची व व्यवहारिक कर्तृत्वाची जबाबदारी बिनसरकारी सहकाऱ्यांनीं उचलली, हा असल्याविषयीं सर्व देशभर ख्याती आहे. कै. वा. सर लल्लुभाई सामळदास व गोपाळ कृष्ण देवधर इत्यादि पुढाऱ्यांनीं केलेली बहुमोल कामगिरी सर्वश्रुत आहे. सरकारनें सुचवलेल्या नव्या योजनेंत अशा स्वार्थत्यागी व आस्थेवाईक कार्यकर्त्यांस जागा ठेवलेला नाहीं हा तिच्यांतला ठळक दोष आहे. इन्स्टिट्यूटची वार्षिक वर्गणी भरून हजारों लोक सहकारी चळवळीस हातभार लावीत आले आहेत. त्यांच्या पाठिंब्यास व सहायास इन्स्टिट्यूट व सहकारी चळवळ मुकणार असल्यानें सरकारी घटनेंतलें हें वैगुण्य दूर करण्यांत आलें पाहिजे. वैयक्तिक सभासदांस इन्स्टिट्यूटच्या घटनेंत व कार्यांत योग्य स्थान देण्यांत येऊन त्यांचें सहकार्य व त्यांच्या वर्गणीचा पैसा ह्यांचा उपयोग पद्धतशीर रीतीनें करून घेणें अगत्याचें आहे. वैयक्तिक सभासदांची कित्येकांस अडगळ वाटते, पण सूक्ष्म विचारांतीं ही त्यांची चूक आहे, हें ध्यानांत आल्यावांचून रहाणार नाहीं. व्यक्तिशः सभासदांचें दडपण सहकारी संस्थांवर अनिष्ट रीतीनें पडूं नये, हें उचित आहे आणि ह्या वर्गांतल्या सभासदांस मर्यादित प्रमाणांत प्रतिनिधित्व दिलें असतां त्याचा सदुपयोगच होईल. इन्स्टिट्यूटच्या वार्षिक सभेंत व्यक्तिशः सभासदांचा भरणा झाल्यानें अनिश्चितपणा उत्पन्न होतो, तसा सोसायट्यांनीं पाठविलेल्या प्रतिनिधींच्या योगानेंहि होत असतो, असा अनुभव आहे. ह्याकरितां वार्षिक सभेविषयींचे नियम बदलणें आवश्यक असून इन्स्टिट्यूटनें प्रांतिक परिषदेच्या मतास अनुसरून मागें सुधारलेली घटना सुचवली होती तीमध्यें अशा प्रकारच्या बदलाचा अंतर्भाव केलेलाच होता.

## ग्वालेर संस्थानांत ग्रामसुधारणा

### कमिटीच्या सूचना

(२)

जनतेची प्राप्ति वाढल्याविना तिची कोणत्याच दिशेनें प्रगति होणें अशक्य आहे असें कमिटीचें स्पष्ट मत असून लोकांच्या उत्पन्नांत निदान दुपटीनें वाढ होणें शक्य आहे, मात्र त्यांस कार्यप्रवण करण्यासाठीं आशादायक वातावरणाची व परिस्थितीची आवश्यकता आहे असें तिचें म्हणणें आहे. ह्या बाबत कमिटीनें असें सुचविलें आहे कीं, (१) कर्जाच्या निवारणाची तजवीज आणि (२) जमिनी आपणांकडे बराच काळपर्यंत रहातील व त्यांच्या सुधारणेमुळें वाढलेल्या उत्पन्नांत योग्य हिस्सा मिळेल अशी जमीनदारांच्या कुळांस शाश्वती असणें अत्यावश्यक आहे. चांगल्या रहाणीशीं त्यांचा परिचय घडवून ती रहाणी त्यांच्या आवाक्यांतील आहे हें लोकांस समजावून दिलें पाहिजे. पुरुषांपेक्षा स्त्रिया ह्या बाबतींत ज्यास्त तत्पर असल्याचें कमिटीस आढळून आलें आहे. सहकार्यानें मालविक्री करण्यास शेतकऱ्यांस उत्तेजन दिलें पाहिजे व त्यांचें सर्वच जीवित सहकाराच्या भावनेनें प्रेरित झालें पाहिजे असा कमिटीचा आग्रह आहे. संस्थानांतून बाहेर जाणाऱ्या मालावर सध्या जकात आकारण्यांत येते, तिच्याविषयीं फेरविचार व्हावा, जमिनीच्या तुकड्यांचें एकत्रीकरण करण्यांत यावें, शेतीच्या पद्धतींत सुधारणा घडवून आणावी, शेतीच्या जनावरांबाबत विशेष दक्षता बाळगावी, खेडेगांवीं उद्योगधंद्यांची स्थापना सहकारी तत्त्वावर करावी, खेडेगांवांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचें निरीक्षण करण्यासाठीं त्याबाबत पहाणी करण्यांत यावी, रस्ते सुधारावेत, पावसानें जमीन धुवून जाते ती जाऊं नये व चांगल्या जमिनींचें संरक्षण व्हावें अशी तजवीज केली जावी, इत्यादि सूचना कमिटीनें केल्या आहेत. खेडेगांवांच्या आरोग्याबाबतहि कमिटीनें शिफारसी केल्या असून ग्रामसुधारणेचें कार्य पद्धतशीरपणें पार पाडण्यासाठीं अधिकारी वर्गाची योजनाहि तिनें सुचविली आहे. ग्रामसुधारणेच्या कार्यक्षेत्रांत स्त्रियांचें स्थान महत्त्वाचें असल्यानें त्याबाबत कमिटीनें विशेष सूचना केल्या आहेत. हें सर्व काम करणारांस पूर्वतयारी म्हणून कांहीं विशिष्ट प्रकारचें शिक्षण मिळालें पाहिजे असा तिचा आग्रह आहे. रेडिओ, हस्तपत्रकें, वर्तमानपत्रें, जाहिरातवजा माहितीचे फलक, नाटकें, गाणीं, ग्रामोफोन, सिनेमे, खेड्यांखेड्यांत सुधारणेबाबत चढाओढी इत्यादि प्रसिद्धीकरणाचे मार्ग कमिटीनें दर्शवले आहेत. संस्थानाचे अधिकारी आणि सरदार, जहागिरदार व इनामदार ह्या वर्गांतील लोकांनीं ग्रामसुधारणेचें कार्यांत नेतृत्व पत्करणें जरूर आहे व सुधारणेचें पाऊल जोरानें पुढें पडावें ह्यासाठीं ह्या चळवळीस अनेकविध मार्गांनें चालना दिली पाहिजे, अशी कमिटीची कळकळीची शिफारस आहे.

## स्फुट विचार

### मध्यवर्ती असेंब्लींत बजेट-चर्चा बंद

कायदेमंडळास अंदाजपत्रक सादर झालें असतां त्याच्या सर्व-साधारण चर्चेसाठी दिवस राखून ठेवण्यांत येतात आणि या चर्चे-नंतर खर्चाच्या रकमांबद्दलच्या मागण्यांचा विचार होतो. यंदा असेंब्लींतल्या युरोपिअनांशिवाय बाकीच्या सर्व पक्षांनीं एकमतानें सर्वसाधारण चर्चेत भाग घ्यावयाचा नाहीं असें ठरविल्यानें हा सांप्रदायिक कार्यक्रम बंद पडला. सरकारच्या खर्चाबाबतच्या मागण्याहि विरुद्ध मतें देऊन नाकारावयाच्या असा त्यांनीं बेत केला. सरकारचा निषेध करण्यांत अनेक पक्षांचा ह्याप्रमाणें एकोपा झाला आहे, यावरून त्याच्या बुडाशी लोकपक्षीय सभा-सदांस बोंचण्यासारखी महत्त्वाची कृति सरकाराकडून झाली असली पाहिजे हें उघड आहे. मध्यवर्ती सरकारच्या अंदाज-पत्रकांत असेंब्लीच्या मतास पात्र असलेल्या आणि पात्र नस-लेल्या अशा दोन प्रकारांच्या बाबींचें वर्गीकरण असतें आणि खर्चाच्या रकमांविषयींच्या चर्चेत सरकारी धोरणावर टीका करून कांहीं खर्च वाटल्यास नामंजूर करण्याचा अधिकार वरील पहिल्या वर्गांतील कलमांच्या बाबतींत असेंब्लीस असतो. लष्करी खर्चापैकी कांहीं किरकोळ बाबी आजपर्यंत असेंब्लीच्या मतास टाकण्यांत येत असून, त्या यंदाच्या अंदाजपत्रकांत, ज्यांवर असेंब्लीस मत देतां येत नाहीं अशा सदरांत ढकलल्या आहेत. कायदा कांहीं म्हणत असला तरी आपला मत देण्याचा वहि-वाटीचा हक्क गमावून बसण्यास असेंब्लीचे लोकनियुक्त सभासद स्वाभाविकपणानेंच तयार नाहींत. वहिवाटीचें रक्षण करून आणि त्यांचा विस्तार करूनच सनदशीर मार्गानें राजकीय हक्क संपादन करण्याची पद्धति ग्रेटब्रिटनमध्यें रूढ झालेली आहे आणि तिचाच अंगिकार मध्यवर्ती असेंब्लींत लोकप्रतिनिधींनीं प्रस्तुत प्रकरणीं केला आहे. ह्या कारणानें सरकारास त्यांस दोष देतां येणार नाहीं.

### मध्यवर्ती कायदेमंडळांतील सभात्याग

लष्करी खात्यावरील खर्च हा मध्यवर्ती असेंब्लीच्या कक्षेतील असल्यानें त्या खात्याच्या खर्चास असेंब्लीच्या मंजुरीची कधीच आवश्यकता नव्हती. तथापि, त्याविषयीं चर्चा करण्याची मुभा गव्हर्नर-जनरलच्या मर्जीप्रमाणें कायदेमंडळास मिळण्यास प्रत्य-वाय नव्हता. चालू वर्षीहि अशी परवानगी असेंब्लीस मिळाली होती. तथापि, नवीन राज्यघटनेनुसार आजवर लष्करी स्वरूपा-च्या परंतु बिनलष्करी खात्याकडे असलेल्या बाबी आतां लष्करी खात्याकडे वर्ग करण्यांत आल्या असल्यानें, त्या विधि-मंडळाच्या कक्षेबाहेर गेल्या आहेत. त्यामुळें त्यांत कपात सुचविण्याचा असेंब्लीचा अधिकार नष्ट झाला आहे. १९३५ च्या कायद्यामधील ह्या प्रतिगामी स्वरूपाच्या अनिष्ट फरकाविरुद्ध लोकमत व्यक्त करण्याकरितां असेंब्लीमधील व कौन्सिल ऑफ् स्टेटमधील लोकनियुक्त सभासदांनीं गेल्या आठ-वड्यांत सभात्याग केला. असेंब्लीनें अंदाजपत्रकांतील कस्टम्स-च्या सदरांतली सबंद मागणी नामंजूर केली, त्यावेळीं सभागृ-हांतील एकाहि लोकनियुक्त सभासदानें सरकारच्या बाजूनें मत दिलें नाहीं. इतरहि अनेक मागण्यांची अशीच वासलात लागली. कायदेमंडळास आपल्या अधिकाराचें संरक्षण कर-ण्याचा अन्य मार्ग उपलब्ध नाहीं, तथापि सर्व पक्षांचें ह्या बाबतींत ऐकमत्य झालें हीं विशेष महत्त्वाची गोष्ट आहे. फेडरे-शनच्या आगमनास हें चिन्ह शुभसूचक नाहीं.

### प्रांतिक अंदाजपत्रकाची चर्चा

प्रांतिक असेंब्लीमध्यें अर्थमंत्र्यांनीं मांडलेल्या अंदाजपत्रकाची सर्वसाधारण स्वरुपाची चर्चा गेल्या आठवड्यांत पुरी झाली. प्रधान मंडळाच्या विरोधकांनीं चर्चेमध्यें केलेल्या टीकेचा प्रगतीच्या दृष्टीनें पुष्कळ उपयोग असतो, आणि विरोधी पक्षांचें काम विरोध करण्याचें आहे, ह्या जुन्या राजकीय सूत्रांत तथ्य आहे, ह्यांत शंका नाहीं. तथापि, विधायक टीका जशी सहायकारक होते तशी टीकेसाठी म्हणून केलेली टीका होत नाहीं, हें उघड आहे. विरोधकांमध्यें भिन्न भिन्न आर्थिक, सामाजिक व राजकीय ध्येयांचे पुरस्कर्ते असतात, त्यांच्याकडून होणाऱ्या टीकेंत विशिष्ट ध्येयांचें प्रतिबिंब उठलेलें असतें. सरकारनें करावयाच्या खर्चाचा ओघ ह्या ध्येयांच्या परिपूर्तीच्या मार्गांत वहावा व तिला उपकारक व्हावा अशी त्यांची स्वाभाविक इच्छा असते. सरकारच्या उत्पन्नाच्या करांच्या व इतर बाबी ह्यांची गोष्टहि अशीच आहे. परिस्थितीनें घालून दिलेल्या मर्यादेंत सरकारचें अंदाजपत्रक जनतेच्या सामा-जिक व आर्थिक उन्नतीस पोषक आहे किंवा नाहीं आणि त्यास त्या प्रकारचें वळण कसें लावतां येईल ह्याचाच विचार मुख्यत्वें-करून लोकांनीं करावयाचा असतो. ह्या दृष्टीनें पहातां प्रांतिक असेंब्लींत श्री. लठ्ठे ह्यांच्या अंदाजपत्रकासंबंधानें सामान्यत: समाधानच व्यक्त करण्यांत आलें असें म्हणावयास हरकत नाहीं. जी कांहीं विध्वंसक स्वरूपाची टीका झाली तिचा ग्रंथ वर केले-ल्या विवेचनानें लागण्यासारखा आहे.

### मुंबई सरकारचें फिनॅन्स बिल मंजूर झालें

विजेवरील पट्टी व स्टँप ड्यूटी ह्यांची मुदत ३१ मार्च १९३८ अखेर संपत होती, ती अमर्याद वाढवून ह्या उत्पन्नाच्या बाबी कायम करण्याच्या विचारानें सरकारनें प्रस्तुत फिनॅन्स बिल विधिमंडळांत मांडलें व असेंब्लीमध्यें त्याचीं तिन्हीं वाचनें पुरीं झालीं. तथापि, ह्या बिलाची आयुर्मर्यादा एका वर्षाइतकीच असावी, ही सूचना सरकारनेंच पुढें मांडल्या कारणानें हा प्रश्न पुढील सालीं पुन: उपस्थित होईल. स्टँप ड्यूटीमधील वाढीस विरोध नव्हताच. स्टॉक एक्सचेंजमधील व्यवहारांप्रमाणें इतर बाजारांतील व्यवहारांवरहि ड्यूटी बसविण्याचा आपला मनोदय फडनवीसांनीं स्पष्ट केला. विजेच्या पट्टीमध्यें कांहीं विवक्षित क्षेत्रांत प्रस्तुत बिलानें थोडी वाढ केली असली, तरी तिचा बोजा ग्राहकांवर बसणार नाहीं, असें फडनवीसांनीं आश्वासन दिलें. वीज कंपन्या सध्या ज्या दरानें वीज पुरवितात, तो दर उतरविला गेल्याखेरीज सरकारी पट्टींत वाढ केली जाणार नाहीं असेंहि आश्वासन त्यांनीं दिलें. मुंबई शहरांतील वीज कंपनीनें आपला दर कमी करण्याचें ठरवलें आहे असें त्यांनीं सांगितलें आणि त्यामुळें मुंबईमधील वीज ग्राहकांस दर यूनिटास ३ पै पेक्षा ज्यास्त सूट मिळेल, असा विश्वास प्रकट केला. अशी रीतीनें, सरकार आपली पट्टी ग्राहकांकडून वसूल न करतां, कंपन्यांकडून करणार आहे. कोर्ट फीमध्यें बदल होणार नाहीं. लवादामार्फत कर्जाची तडजोड होण्याची व्यवस्था सरकार करणार असल्यानें, ह्या बाबीपासून मिळणारें उत्पन्न घटण्याचाच संभव आहे. फिनॅन्स बिलांतील करवाढी-मुळें सरकारचें उत्पन्न सुमारें आठ लक्ष रुपयांनीं वाढेल.

### सोन्याच्या नाण्यांस मागणी—अविश्वासाचें चिन्ह

चालू महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत नेहमीप्रमाणें हिंदुस्थानांतून सोनें परदेशीं गेलें. परंतु त्यांतला बराच मोठा भाग लंडनला जावयाचा, तसें त्या आठवड्यांत झालें नाहीं, हें विशेष आहे. सप्टेंबर १९३१ मध्यें इंग्लंडनें सुवर्णचलनाचा त्याग केल्यापासून लंडनला हिंदी सोनें न जाण्याचा हा पहिलाच आठवडा आहे. लंडनच्या बाजारांत सोन्याची उलाढाल आतां होत नाहीं असें अनुमान मात्र त्यावरून काढावयाचें नाहीं. युरोपमध्यें राजकीय अस्वस्थता उत्पन्न झाल्यानें भविष्यकाळ अनिश्चित वाटून लोक नाण्याच्या स्वरूपांत सोनें जमवून गाठीं बांधूं लागले आहेत. उद्यां युद्ध झालें तर कागदाचें चलन व इतर मालमत्ता उपयोगी पडणार नाहीं, पण सोन्याची किंमतवान सुटसुटित नाणीं जवळ ठेवावयास विशेष सोयीचीं आहेत, ह्या भावनेनें भारी किंमतीनें त्यांची खरेदी-विक्री गेल्या एकदोन महिन्यांत होत आहे. १९३७ सालीं बारा महिन्यांत मिळून इंग्लंडमध्यें ६३ कोटि रुपये किंमतीचीं सोन्याचीं नाणीं बाहेरून आलीं. चालू वर्षाच्या केवळ पहिल्या पांच आठवड्यांची आयात सुमारें ६ कोटि रुपयांची झाली आहे. सोन्याच्या नाण्यांच्या निर्गतीचे आकडे जवळ जवळ हेच आहेत. म्हणजे, गेल्या सबंद वर्षांत लंडनमधून जेवढ्या किंमतीचीं हीं नाणीं परदेशीं गेलीं, तेवढ्याच किंमतीची दरदहा नाणीं चालू सालाच्या पहिल्या पांच आठवड्यांत गेलीं. सोन्याच्या चिपांच्या मानानें नाण्यांस तीन ते चार टक्के अधिक किंमत येत आहे. नाण्यांच्या निर्गतीपैकीं बराच मोठा भाग फ्रान्समध्यें चालला आहे आणि लंडनमध्यें होणाऱ्या आयातींत कॅनडाचा हिस्सा मोठा आहे. नाण्यांस येणाऱ्या अधिक किंमतीचा फायदा कित्येक मध्यवर्ती बँका घेत असून शिलकी नाणें काढून टाकीत आहेत. नाण्यांच्या ऐवजी चिपा बाळगल्या असतां नफा मिळून आपला सुवर्णनिधि कायम ठेवण्याची त्यांची चांगली सोय झाली आहे.

---

### ब्रिटनच्या संरक्षणार्थ खाद्य पदार्थांची साठवण

वहातुकीच्या साधनांत सुधारणा आणि चोहोंकडे निर्वेधपणानें व्यापार चालण्याच्या सोयी झाल्या असतां दुष्काळाची भीति नाहींशी होऊन देशांतल्या देशांत आणि राष्ट्राराष्ट्रांमध्यें खाण्याचे व इतर पदार्थ ह्यांच्या मागणी-पुरवठ्याचा मेळ उत्कृष्टपणानें बसतो ही कल्पना योग्य आहे आणि अनुभवसिद्धहि आहे. परंतु अलीकडे युद्धाची व व्यापार बंद होण्याची भीति चोहोंकडे पसरल्यानें प्रसंगीं उपयोगी पडेल अशी खाण्याच्या जिनसांची साठवण सुरक्षित रीतीनें करण्याची आवश्यकता राष्ट्रांस भासूं लागली आहे. ग्रेटब्रिटन हें बेट आहे, ह्या कारणानें युरोपांतल्या भानगडींपासून अलिप्त राहून, नाविक बलाच्या जोरावर त्या राष्ट्रास अन्नाच्या पुरवठ्याची व्यवस्था यशस्वीपणानें करतां येत असे. परंतु लढाऊ विमानांची प्रगति अलीकडे झपाट्यानें झाली आहे. त्या योगानें नाविक बळावर विसंबून राहणें ग्रेटब्रिटनला धोक्याचें वाटत आहे. समुद्रावरून अन्नसामुग्री आणणाऱ्या आगबोटी हतबल झाल्या असतां ब्रिटिश बेटांची उपासमार होईल, ह्याकरितां ग्रेटब्रिटनमध्यें धान्यधुन्य वगैरे मालाची पुरेशी साठवण करण्यांत यावी अशी सूचना तेथील सरकारास करण्यांत येत आहे. अन्नसामुग्रीची पैदास वाढवणें शक्य असलें तरी त्या मार्गानें होणारी पुरवठ्यांतली वाढ मर्यादित राहणार हें उघड आहे. गेल्या सहा वर्षांत ब्रिटनचा अन्नाचा स्वदेशी पुरवठा एक पंचमांशानें वाढला आहे, पण त्याकरितां सरकारी तिजोरींतून शेतीच्या व इतर धंद्यांस द्रव्यसहाय द्यावें लागलें आहे. साठवणीचा खर्चहि फार मोठा येईल आणि त्या प्रयत्नानें पदार्थांच्या किंमती वाढतील अशी भीति आहे. दोन्ही उपाय खर्चाचे व अडचणीचे आहेत आणि ब्रिटिश सरकारानें त्यांचे बाबतींत कोणतीच निश्चित योजना केलेली नाहीं. तथापि, हा प्रश्न महत्वाचा असून त्याचा कांहीं तरी निकाल लावावा लागेल. राष्ट्रीय अगत्याच्या जिनसांच्या उत्पादनास सरकारी द्रव्यसहाय देऊन त्यांचा पुरवठा वाढवण्याचें धोरण इंग्लंडमध्यें मान्यता पावत आहे हें येथें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

### विद्यार्थ्यांनी मोटारगाड्या ठेवण्यावर निर्बंध

विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांस मोटार गाडी ठेवण्याचा अधिकार असूं नये, असें लॉर्ड एल्टन ह्यांनीं ऑक्सफर्ड येथील आपल्या एका भाषणांत नुकतेंच सांगितलें. कित्येक विद्यार्थी मोटारींचा उपयोग घोड्यांच्या शर्यतीस हजर राहण्याकडे करतात, असें त्यांचें म्हणणें आहे. केंब्रिज येथील दोन कॉलेजांत, विद्यार्थ्यांस मोटार ठेवण्याची मनाई आहे. इतर कॉलेजांत,वरच्या वर्गांतील विद्यार्थ्यांसच फक्त मोटार ठेवण्याची मोकळीक आहे. सायंकाळीं मोटारी आपल्या तबेल्यांत परत आल्याच पाहिजेत, असा तेथें नियम आहे. ऑक्सफर्ड येथील कॉलेजांतील नियम इतके कडक नाहींत.

### कोळशापासून पेट्रोल अद्याप किफायतशीर नाहीं

कोळशापासून पेट्रोल बनविण्याच्या धंद्यास किती वाव आहे, ह्याची चौकशी करण्यासाठीं ब्रिटिश सरकारतर्फे नेमण्यांत आलेल्या फालमथ कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. अशा प्रकारच्या धंद्यास मोठ्या प्रमाणावर फोफावण्यास ब्रिटनमध्यें वाव नाहीं; आयात मालाचा साठा करून ठेवणें हेंच सर्वांत फायदेशीर आहे, असा कमिटीचा अभिप्राय आहे. तथापि कोळशापासून पेट्रोल बनविण्याच्या क्रियेसंबंधाच्या संशोधनास उत्तेजन मिळावें, ह्यासाठीं सध्याचें दर गॅलनी ८ पेन्सांचें संरक्षण वाढवून १२ वर्षांपर्यंत तें चालू राहील अशी हमी सरकारनें द्यावी, असें कमिटीचें म्हणणें आहे.

### पुणें अनाथ विद्यार्थी गृह

बुद्धीनें हुषार व नेहमी वर्गांत वरचा नंबर असणारे, दरवर्षी चांगल्या तऱ्हेनें पास होणारे, परंतु गरिबीमुळें अडलेले असे स्पृश्य हिंदु विद्यार्थी संस्थेंत घेणें आहेत. वय १२ ते १५ असावें व वयाप्रमाणें शिक्षण झालेलें असावें. मराठी ५ ते ७ इयत्ता व इंग्रजी १ ते ३ इयत्तांचे विद्यार्थी नाशिक येथें ठेविले जातात व वरच्या वर्गांतील पुण्यास असतात. दाखल होण्यापूर्वीं संस्थेचा छापील अर्ज भरून पाठवावयाचा असतो. अर्धीच आण्याचें पोस्टेज पाठवून हा फॉर्म मागवावा व ता. १५ एप्रीलचे आंत तो भरून पाठवावा.

---

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठीं भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना
गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७१ : लक्ष्मी रोड—गणपती चौक-पुणें.

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

## मुंबई प्रांतांतील रस्ते

### पेट्रोल फंडाचा विनियोग

हिंदुस्थान सरकारनें पेट्रोलवर पट्टी बसवून, तिच्या उत्पन्नांतून प्रांतिक सरकारांस रकमा वांटून देण्याचें ठरविलें, त्यांपैकीं मुंबई सरकारच्या वांट्यास खालीलप्रमाणें "रोड फंडा" चा हिस्सा आला आहे:—

| वर्ष | (रु.) रकम लक्ष | हजार |
|---|---|---|
| १९३०–३१ | २५ | ६० |
| १९३१–३२ | ११ | ६० |
| १९३२–३३ | २० | ८७ |
| १९३३–३४ | १७ | ४६ |
| १९३४–३५ | १९ | ९४ |
| १९३५–३६ | २२ | ६४ |

ह्या फंडांतून मुंबई सरकारनें वेळोवेळ रस्त्यांचे प्रीत्यर्थ खर्च केला. एप्रिल, १९३६ मध्यें सिंध प्रांत विभक्त झाला, त्यावेळीं मुंबई प्रांताच्या रोड फंडांत ४१ लक्ष, ६१ हजार रु. शिल्लक होते. १९३६–३७ मध्यें १९ लक्ष, ३६ हजार रु. मिळाले व १९ लक्ष ९८ हजार रु. खर्ची पडले. १९३७–३८ मध्यें मुंबई प्रांतास मध्यवर्ती रोड फंडांतून २० लक्ष रु. मिळतील अशी अपेक्षा आहे व खर्च ४० लक्ष ७१ हजार रु. होईल असा अजमास आहे. म्हणजे, १९३८–३९ सालाकरितां फंडांत २० लक्ष ५८ हजार रु. उरतील त्यांत येत्या वर्षांतील अपेक्षित २० लक्ष रु. मिळविले म्हणजे १९३८–३९ सालीं खर्च करण्यासाठीं ४० लक्ष ५८ हजार रु. राहतील. ह्या वर्षांतील प्रस्तुत बाबीवरील अंदाजी खर्च ३४ लक्ष रु. आहे.

रोड फंडांतून मिळणारी रकम आपल्या इच्छेप्रमाणें रस्त्यांवर खर्चण्यास प्रांतिक सरकारांस मुभा नाहीं. प्रत्येक प्रांतास आपल्या योजना मध्यवर्ती सरकाराकडून मंजूर करून घ्याव्या लागतात. नियोजित रस्त्यांची रेल्वे फांट्यांशीं स्पर्धा होऊं नये असें मध्यवर्ती सरकारचें धोरण आहे. रस्त्यांच्या सुधारणेमुळें रेल्वेजचें उत्पन्न बुडतां कामा नये हें त्यांतील प्रमुख तत्व आहे. पेट्रोल कराची जी रकम प्रांतिक सरकारांस मिळेल तिच्यापैकीं एक चतुर्थांशापेक्षा ज्यास्त रकम दुय्यम रस्त्यांवरच खर्च केली पाहिजे व एक चतुर्थांशापेक्षा कमीच रकम रेल्वेजशीं स्पर्धा करणाऱ्या रस्त्यांवर खर्च झाली पाहिजे, असा निर्बंध प्रांतांस पाळावा लागतो. ह्या नियंत्रणास अनुसरून, सबंध मुंबई प्रांताकरितां रस्त्यांच्या योजनेची आंखणी करण्यासाठीं मुंबई सरकारनें ३०-४-३७ रोजीं एक स्वतंत्र अधिकारी नेमला. त्यानें एक सप्तवार्षिक कार्यक्रम तयार केला व तो मंजूर झाला आहे.

मुंबई-अहमदाबाद रस्त्याविषयीं विचार करण्याकरितां मध्यवर्ती व मुंबई सरकारांच्या प्रतिनिधींची एक बैठक नुकतीच भरली होती. कांहीं अटी घालून, हिंदुस्थान सरकार ह्या रस्त्याची योजना मंजूर करील अशी अपेक्षा आहे. असें झालें, म्हणजे भडोच जवळील नर्मदा पूल विकत घेण्याच्या व खेडा येथें पूल बांधण्याच्या उद्योगास मुंबई सरकारास लागतां येईल. सुरत–धुळे रस्त्याबाबतची मुंबई सरकारची योजना मात्र फेटाळण्यांत आली आहे. मुंबई उपनगरांतील रस्त्यांची सुधारणा सरकारनें हातीं घेतली असून मुंबई–पुणें रस्त्याच्या सुधराईसहि मंजूरी मिळाली आहे. मुंबई–नाशिक रस्त्याच्या सुधारणेचा विचार चालू आहे.

१ एप्रिल, १९३६ पासून रस्त्यांवरील टोल नाकीं काढून टाकण्यांत आलीं व त्यांचे ऐवजी मोटारींवर कर बसविण्यांत आला. ह्या कराचें निवळ उत्पन्न एकाद्या वर्षी २९ लक्ष, ५७ हजारांपेक्षा ज्यास्त आलें, तर, तें एका स्वतंत्र 'प्रांतिक रोड फंडां'त टाकावयाचें असतें व त्याचा विनियोग मुंबई सरकारच्या अधिकारांत करतां येतो. १९३६–३७ च्या हिशेबान्वयें ह्या फंडांत ७ लक्ष, ९६ हजार रु. जमा झाले, त्यांतील ३½ लक्षांचा विनियोग प्रांतिक रस्त्यांच्या दुरुस्तीकडे करण्यांत आला.

मुंबई प्रांतांतील ६,३३१ मैल लांबीचे खडीचे व ५३९ मैल लांबीचे साधे रस्ते पब्लिक वर्क्स खात्याकडे आहेत. ते दुरुस्त राखण्यासाठीं १९३७–३८ सालाकरितां २७ लक्ष ९९ हजार रु. मंजूर आहेत. ही रकम पुरेशी नाहीं व त्यामुळें रस्ते खराब होऊं लागले आहेत, ह्याची सरकारास जाणीव आहे. तथापि, आहे त्या पैशांतच रस्ते शक्य तितके चांगले राखण्याचें सरकारचें धोरण आहे.

### इंग्रजी साप्ताहिकाचा संसार

पाश्चात्य देशांमध्यें वृत्तपत्रांचा धंदा केवढ्या अवाढव्य प्रमाणावर चालतो ह्याची कल्पना एका ब्रिटिश साप्ताहिकानें स्वतःच्या संसारासंबंधानें दिलेल्या माहितीवरून चांगली येईल. अनेक लेखक व चित्रकार ह्यांचें सहकार्य त्या पत्राच्या संपादकास घ्यावें लागतें व त्याबद्दल योग्य मोबदला द्यावा लागतो. त्यांनीं एकूण अडीच हजार लांबरुंद पृष्ठें एक वर्षांत लिहून तयार केलीं व तीं छापून निघालीं. त्यांमध्यें पंचवीस लक्ष शब्द होते. साप्ताहिकाच्या एकूण चार कोटि प्रती छापल्या गेल्या व त्यांस सात हजार टन वजनाचा कागद लागला. चार फूट रुंदीचा असा पट्टा त्या कागदाचा केला असता तर त्यानें पृथ्वी दोनदा वेष्टिली असती. पत्राचा दर आठवड्याचा एकूण खर्च पासष्ट हजार रुपये येतो, म्हणजे एका वर्षांत सुमारें बत्तीस लक्ष रुपये लागतात. अशा साप्ताहिकाच्या वाचकांस एका प्रतीचें दर वर्षास फक्त सुमारें सहा रु. पडतात!

### मि. डी व्हॅलेरा ह्यांचें औद्योगिक धोरण

स्वतंत्र आयर्लंडच्या औद्योगिक धोरणास अनुलक्षून मि. डी व्हॅलेरा अलीकडील एका भाषणांत म्हणाले:—"आयरिश कारखान्यांचें उत्पादन १९३१ ते १९३६ ह्या वर्षांच्या अवधींत ३४ कोटि रुपयांवरून ४५ कोटींच्या वर गेलें आहे. कारखानदारांनीं धंद्यांच्या विस्ताराबाबतचे प्रयत्न थंड पडूं देतां कामा नयेत आणि त्यांस तसें करूं दिलें जाणार नाहीं. औद्योगिक क्रांतीचा क्रम पुरा झाला पाहिजे आणि प्रत्येक वस्तूच्या संबंधानें क्रांति घडून आली पाहिजे." ग्रेट ब्रिटनच्या मानानें आयर्लंडमधले बाजारभाव चढीचे असूं नयेत ह्यासाठीं घ्यावयाच्या खबरदारीसंबंधानें मि. डी व्हॅलेरा म्हणाले:—"कारखानदारांनीं आकारलेले मालाचे भावच केवळ नव्हेत, तर व्यापारी व दुकानदार ह्यांच्या किंमतीहि सरकारच्या कडक निरीक्षणांतून सुटणार नाहींत."

### मुंबई प्रांतांतील जमीन गहाणाच्या बँका

"मुंबई प्रांतांत एकूण १३ प्राथमिक जमीन गहाणाच्या बँका स्थापन झालेल्या असून, त्यांनीं जून, १९३७ अखेर ६ लक्ष, ६५ हजार रु. शेतकऱ्यांस कर्जाऊ दिलेले आहेत. अहमदाबाद, ठाणें, मुंबई उपनगर, अहमदनगर, सोलापूर, रत्नागिरि, कुलाबा व विजापूर ह्या जिल्ह्यांतून अद्याप जमीन गहाणाच्या बँका निघालेल्या नाहींत. विजापूर जिल्ह्यांत अशी बँक सुरू करण्याचा सरकारचा विचार आहे" अशी माहिती महसूल मंत्र्यांनीं मुंबई विधिमंडळांत दिली.

### अंदाजपत्रक व फिनॅन्स बिल

अंदाजपत्रकांत दाखल झालेल्या जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी करांच्या आकारणींत फेरबदल आवश्यक होतो. त्यांचा अंतर्भाव ज्या बिलामध्यें सरकार करतें त्यास फिनॅन्स बिल म्हणतात. अंदाजपत्रकावरून उद्भवलेल्या कर-योजना फिनॅन्स बिलांत असतात.अंदाजपत्रक मान्य झालें,म्हणजे सरकारी खर्चास कायदेमंडळाची मंजूरी मिळते व फिनॅन्स ॲक्टानें करविषयक योजनेंतील फेरफारास विधिमंडळाची संमति मिळते.मुंबई सरकारच्या नुकत्याच पास झालेल्या फिनॅन्स बिलानें (जमाबंदी बिलानें ) सरकारास आठ लाखांचें नवें उत्पन्न उपलब्ध करून दिलें आहे.

---

### पैशाच्या अभावामुळें नादुरुस्त रेल्वेज

जर्मन राष्ट्र युद्धसामुग्रीवर बराच पैसा खर्च करीत आहे. परंतु रेल्वेजच्या रोजच्या निकडीच्या गरजा भागवल्या न गेल्या कारणानें त्यांवरील अपघातांचें प्रमाण वाढत आहे. १९३७ च्या पहिल्या नऊमाहींत, १९३६ च्या तत्सम मुदतीच्या मानानें, ३९ टक्के ज्यास्त वेळां गाड्या रुळांवरून खाली घसरल्या, ३२ टक्के ज्यास्त वेळां त्यांच्या टकरी झाल्या व रेलवेजवर माणसांस झालेल्या अपघातांची संख्या १८९ टक्क्यांनीं ज्यास्त भरली. १९३३ सालानंतर आतां वहातुक ७० टक्क्यांनीं वाढली असली तरी डब्यांची संख्या १० टक्क्यांनीं कमी झाली आहे.

---

### शेतीचें महत्त्व

जगांतील सर्व देशांत मिळून ८६१/२ कोटि लोकांस चरितार्थ मिळवून देणारें काम आहे, त्यांपैकी ५५१/२ कोटि लोक शेती करतात, असा आंतरराष्ट्रीय मजूर संघाचा अजमास आहे. मजूर संघानें नेमलेल्या कायम शेतकी कमिटीचें अधिवेशन नुकतेच पार पडलें. ह्या कमिटीनें, शेतीव्यवसायांतील कामगारांस पगारी रजा मिळावी व त्यांचे पगार निश्चित ठरविण्यांत यावे, असा ठराव संघाच्या बैठकींत मांडला जावा असें सुचविलें आहे. शेतीचा धंदा सुधारलेल्या राष्ट्रांप्रमाणें हिंदुस्थानांत किफायतशीर व सुव्यवस्थित नसल्यानें वरील सूचनांचा विचारच येथें उद्भवत नाहीं. ग्रेटब्रिटनमधील शेतांवरील कुशल कामकऱ्यास महिना सुमारें १०० रु. मिळतात.

---

### चहा-कॉफीची आवड

चहाच्या धंद्यांत ब्रिटिशांचें पुष्कळ भांडवल गुंतलें आहे. खुद्द इंग्लंडमध्यें जनतेंत चहा फार खपतो. तसा तो इतर पाश्चात्य देशांत खपावा म्हणजे ह्या ब्रिटिश धंद्याची भरभराट होईल ह्या कल्पनेनें त्याबद्दलचा प्रचार चालला आहे. अमेरिकेसारख्या तेरा कोटि वस्तीच्या श्रीमान राष्ट्रांतील जनतेस चहाची चटक लागल्यास काय बहार होईल असें त्यांस वाटत आहे. ब्रिटिशांच्या वंशांतलेच अमेरिकन लोक, पण चहाच्या संवयींचे बाबतींत किती मागसलेले ! शंभरांतल्या पन्नास अमेरिकनांच्या जिभेस चहा एकदांहि शिवलेला नाहीं आणि अनेक अमेरिकन कुटुंबांत चहाची किटली हा पदार्थहि माहीत नाहीं. कॉफीची आयात मात्र अमेरिकेमध्यें चहाच्या वीस पटीनें होते.


FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.



एच. एच. दि छत्रपति महाराजा
ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखालील
जाधव कॉलेज ऑफ
टेलरिंग ॲन्ड कटिंग
जानेवारीपासून नवीन वर्ग सुरू झाले. नांवें नोंदवा.
नवीन माहितीपत्रक मागवा. ४१७ बुधवार, पुणें.

CONFIDENCE
is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its
YEARS OF
Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service
HAS CREATED
PUBLIC CONFIDENCE
The following figures will convince you :
NEW BUSINESS
Last year 1936-37
Exceeds
2 CRORES & 82 LAKHS
BONUS
PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20
HINDUSTHAN
Co-operative Insurance Society, Ltd.
( ESTD. 1907 )
*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Office :* throughout India & the East.
S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.
POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## तंबाखूवरील कराच्या उत्पन्नांत वाढ

### मुंबई सरकारचें बिल

मुंबई सरकारच्या दारूबंदीच्या धोरणामुळें त्यांच्या उत्पन्नांत येणारी तूट इतर मार्गानें भरून काढणें त्यांस क्रमप्राप्तच आहे. तंबाखूवरील कराच्या कायद्यांत दुरुस्ती करणारें एक बिल सरकारनें विधिमंडळास सादर केलें, त्यांतील हेतु तोच आहे. ह्या कायद्याची आयुर्मर्यादा चालू वर्षअखेर संपत होती, ती प्रस्तुत बिलानें वाढविली असून करवसुलीच्या पद्धतींतहि सुधारणा सुचविल्या आहेत. तंबाखूची किरकोळ विक्री करणारांवर हिशेब ठेवण्याची जबाबदारी चालू कायद्यानें टाकलेली आहे, ती जाचक असल्यानें कायद्यांत इष्ट ती दुरुस्ती करण्यांत येणार आहे. किरकोळ व्यापाऱ्यांच्या लायन्सेस फीचीं आकारणी ह्यापुढें एका अल्प दरानें केली जाईल. त्यामुळें होणारें सरकारचें नुकसान घाऊक व्यापाऱ्यांवरील आकारणींतून भरून येईल. मुंबई शहरांतील लायसेन्सची वार्षिक फी चांगल्या दर्जाच्या तंबाखूचे बाबतींत ५० रु. व कनिष्ठ दर्जाच्या तंबाखूच्या बाबतींत २५ रु. अशी निश्चित करण्यांत येणार आहे. कांहीं विशिष्ट क्षेत्रांत—उदाहरणार्थ, मुंबई उपनगरांत—तंबाखू विक्रीवर, विक्रीच्या किंमतीच्या मानानें कर बसविला जाईल.

---

### हिंदुस्थानचा जपानशीं व्यापार

१९३७–३८ च्या पहिल्या नऊ महिन्यांत हिंदुस्थानानें जितक्या किंमतीचा माल जपानकडे पाठविला, त्यापेक्षा सुमारें तीन कोटींचा जास्त जपानी माल हिंदुस्थानांत उतरला. कपाशीच्या निर्गतीमधील घट हें त्याचें प्रमुख कारण आहे.

### सुएझ कालव्याचे व्यवस्थेंत ग्रेट ब्रिटनचा हात

सुएझ कॅनॉल कंपनीचे डायरेक्टर बोर्डावरील ३२ जागांपैकी १९ जागा फ्रान्सच्या वांटणीच्या आहेत, ग्रेट ब्रिटनच्या वांट्यास १० जागा येतात व इजिप्त व हॉलंड ह्यांस अनुक्रमें दोन व एक अशा जागा मिळतात. ब्रिटिश सरकारच्या मालकींत कंपनीचे ६५ कोटि रुपयांचे ३½ लक्ष भाग आहेत.

### भंडारदरा धरण

गोदावरी नदीस मिळणाऱ्या प्रवरा नदीवर अहमदनगर जिल्ह्यांत भंडारदरा येथें धरण बांधलेलें आहे, त्याची उंची नदीच्या तीरापासून २७८ फूट भरते. बांधकामाची रुंदी तळाशी २३४ फूट आहे ती कमी, कमी होत वरती २० फूट रहाते. धरणाची लांबी १,६६३ फूट आहे. ह्या धरणाइतकें उंच धरण हिंदुस्थानांत दुसरें नाहीं. ह्या धरणापासून खालीं चार मैलावर प्रवरा नदीचा धबधबा आहे, तेथें वीज तयार करतां येण्याजोगी अनुकूल परिस्थिति आहे.

### ब्रिटिश मोटार कामगारांचें वेतन

ग्रेट ब्रिटनमधील मोटार कारखानदारांस प्रत्येक नगामागें सुमारें १६० रु. निव्वळ नफा होतो. ह्या धंद्यांतील कामगारास महिना सुमारें २५० रु. मिळतात. अमेरिकन मोटार कामगाराची मासिक प्राप्ती ३२५ रुपयांचे पेक्षा ज्यास्त असते.

### ब्रिटिश गिरणवाले व हिंदी कपास

ब्रिटिश कॉटन ग्रोइंग असोसिएशननें उंची प्रतीच्या कपाशीची लागवड पंजाब व सिंध ह्या प्रांतांत केली आहे. त्या प्रतीची कपास पिकण्याविषयीं सिंधपेक्षा पंजाबांत शेतकऱ्यांमध्यें अधिक उत्साह आहे असें मत असोसिएशनचे अध्यक्ष, सर वुइल्यम हिंबरी, ह्यांनीं येथून विलायतेस परत जातांना नुकतेंच व्यक्त केलें.


## जाहिर नोटीस.

### औंध स्टेट सेंट्रल बँक लि. औंध

शाखाः—आटपाडी, कुंडल, गुणदाळ, विचूद, दिघंची

आम्ही मुदतठेवी खालील व्याजाचे दरानें स्वीकारतों :—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मुदत | १ | वर्ष | द. द. | २ | टक्के. |
| ,, ,, | २ | ,, | ,, ,, | २॥ | टक्के. |
| ,, ,, | ३ | ,, | ,, ,, | ३ | टक्के. |
| ,, ,, | ४ | ,, | ,, ,, | ३॥ | टक्के. |
| ,, ,, | ५ | ,, | ,, ,, | ४ | टक्के. |

औंध, ( जि. सातारा ) ता. २०–१–३८. } बी. आर. वर्तक, मॅनेजर.

## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

| | |
|---|---|
| उभारलेलें भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,०५,५०,००० |

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रें ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), कुलाबा ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता–बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

### चालू ठेवींवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंटः— टी. आर. लालवाणी.

घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास
सर्वोत्कृष्ट–सचित्र–सुबोध–माहितीपूर्ण

## संगीत–मार्गदर्शक

मालेचीं पुस्तकें.

| गायन | हार्मोनियम | दिलरुबा | फिडल् |
|---|---|---|---|
| किं. ६ आ. | किं. २॥ रु. | किं. १ रु. २ आ. | किं. १ रु. ४ आ. |

व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.

प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते.
भेटा अगर लिहाः—

**भाऊ गंगाधर साठे,** कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं
असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ भिवंडी ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ वाई ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोला |

## खेळतें भांडवल रु. २०००००० चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकारितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.



## गव्हाचे पोहे

(REGD.) **( BLOSSOM )** (REGD.)

कित्येकांना गहूं खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात. विशेषत: लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्यांचा उपयोग हितकारी ठरतो.

ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधांतून खातां येतात.

७५३ सदाशिव, पुणें २.
भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे
कारखानदार.




## ब्यांकेच्या उतरत्या व्याजाचे काळांत

डॉन ऑफ इंडियाच्या ६% मासिक आवक ठेव योजनेचा फायदा ता. ३१-३-३८ पर्यंत देण्यांत येईल. माहिती करितां लिहा.

जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.





## टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स

[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क ( काम ) तयार करतात. ]

मो. मु. टिळक
प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर,






अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

## झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]



The Home for
Reliable STENO-TYPIST & ACCOUNTANTS
MARATHI KENDRA : 292 Sadashiv Peth
POONA



## K. K. & Co.

Photographic Dealers
POONA.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११९—२ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०४—८ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८—८ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९८—८ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०६—४ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | १००—६ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४६—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११५—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३२-१० |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५८०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १२०—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०२—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९२०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७५०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | ११५-१५ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २२२—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१०—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३७७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४७०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १६२-१२ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४६—२ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०—८ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ४०-१० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु. बोनस ... | ४,४००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०५-१० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १७०—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | २५२—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १०७०—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३४—८¾ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५१—५ |


## औंध स्टेट सेंट्रल बँक लिमिटेड, औंध.

( स्थापना–८ आक्टोबर १९३२ )

हेड ऑफिस–औंध ( सातारा )

शाखा–आटपाडी, कुंडल, गुणदाळ, किर्लोस्करवाडी स्टेशन व दिघंची.

चालू ठेवींवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवींवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जे–सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेंचे तारणावर कर्जें दिलीं जातात.

चेक, हुंड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B. R. Vartak
मॅनेजर.

## न्यू इंडिया अॅशुअरन्स कं. लि. मुंबई

( सर्व तऱ्हेचें विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी. )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यतः खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतोः—

(१) कंपनीचें स्थैर्य. (२) उत्तम व्यवस्था.

(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता.

"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल.

प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.

श्री. डी. के. जोगळेकर, बी. ए.,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें ( २ )

## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध **आर्डोमिक्स** ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेतेः—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )**

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर.

**S. B. JOSHI & Co.**

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

पोषाक निटिंग, सडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६१५ सदाशिव पेठ.

**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद.

SAHYADRI INS. Co

NASIK

BEST TO CHOOSE & TO REPRESENT

WANTED WORKERS OF EITHER SEX.

Particulars by post or in person.

**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळः—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.

**स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा**

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २५, किंवा प्रथम ६८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज; अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इन्व्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.

द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर - मुंबई.

यांचे ओरिजिनल

**ब्राह्मी तेल**

मेंदूचे विकार व डोकें दुखणें यांवर

**बाळंतकाढा**

मुलांकरितां **बाळकडू.**

**कुमारी आसव**

नं. १ दहा दिवसांत घेणेचा.

नं. २ दहा दिवसांनंतर घेणेचा.

मुख्य दुकानः ठाकुरद्वार, शाखाः परळ व दादर.

पुणें एजंटः—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें

अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.

सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.

वेडेकर



डेक्कन मसाला


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.